International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# भारतीय लोकशाहीतील राजकीय पक्षांची धोरणे आणि मार्गदर्शक तत्वे

**डॉ. अशोक बा. जाधव**
*राज्यशास्त्र विभाग, शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा*
***Corresponding Author - डॉ. अशोक बा. जाधव***
**DOI - 10.5281/zenodo.10952008**

**प्रस्तावना :**

संविधानातील प्रकरण चार मधील कलम 36 ते 51 मध्ये मार्गदर्शक तत्वांची तरतूद आहे. मार्गदर्शक तत्वे ही सर्वच राजकीय पक्षांना दिशा दाखवण्याचे कार्य करतात. मार्गदर्शक तत्वातील कलमांचा राजकीय पक्ष आपल्या जाहीरनाम्यात उल्लेख करतात. राज्यकर्त्यांनी नैतिक मूल्यावर आधारित राज्यकारभार करणे अपेक्षित असते. राजकीय पक्षाने जाहीरनाम्यात दिलेल्या धोरणांची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरते. मार्गदर्शक तत्वे कल्याणकारी राज्याची उद्दिष्टे साध्य करणारी असल्याने त्यांच्या अंमलबजावणीला महत्त्व प्राप्त झाले आहे. राजकीय पक्षांनी आपल्या ध्येयधोरणाद्वारे केवळ राजकीय सत्ता हस्तगत करणे एवढाच उद्देश नसून संपत्तीचे समान वाटप, रोजगाराचा हक्क, सक्तीचे शिक्षण, कामगार कल्याण, या तत्त्वांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर आपल्यापुढे असलेली गरिबी, दारिद्र्य, उपासमार या मार्गदर्शक तत्त्वांची कार्यवाही करणे अपेक्षित ठरते.राजकीय पक्ष सत्ता मिळवण्यासाठी,ती टिकवण्यासाठी आणि पुन्हा सत्तेत येण्यासाठी पोकळ आश्वासनाची गॅरंटी देताना दिसतात.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

1) संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश अभ्यासणे.
2) भारतीय लोकशाहीतील राजकीय पक्षांच्या धोरणांचा अभ्यास करणे.
3) बदलत्या राजकीय पक्ष व्यवस्थेचा अभ्यास करणे.

**मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश:**

राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये असा आहे. समाजातील भांडवलदार, श्रीमंत आणि जमीनदार वर्गाच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये. देशातील जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी सर्वांना समान संधी मिळावी, समाजात समता प्रस्थापित करून समाजवादी समाज रचनेच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा आहे. समाजाची उभारणी ही नीती तत्त्वावर

होणे गरजेचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,"राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक बाबतीत समतेचे तत्व लागू करणे म्हणजे समाजरचना नीतीच्या पायावर उभा करणे होय."[1] समतेच्या तत्वावर समाज रचना करणे अशी त्यांची धारणा होती. शोषण आणि विषमता युक्त व्यवस्थेलाच नेस्तनाबूत करण्याचा त्यांचा उद्देश होता.राजकीय पक्षांच्या ध्येय-धोरणात समाजवादी समाजरचना हे धोरण दिसते पण कार्यवाही पाहिजे तेवढ्या प्रमाणात होत नाही.19 नोव्हेंबर 1948 रोजी मार्गदर्शक तत्त्वांचा संविधानात समावेश करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते,"मार्गदर्शक तत्वे पवित्र घोषणा म्हणून स्वीकारण्यात आलेली नाहीत. भावी कायदेमंडळ व मंत्रिमंडळाने राज्यकारभार कसा करावा यासंबंधी दिलेले ते उद्देश आहेत. त्यांच्या कृतीचा पाया ही मार्गदर्शक तत्वे बनली पाहिजेत. हा मार्गदर्शक तत्वे समावेश करण्याचा हेतू आहे. भारतात राजकीय लोकशाही बरोबर आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी आणि भारत हे कल्याणकारी राज्य होण्यासाठी राज्याची मार्गदर्शक तत्वे उपयुक्त आहेत."[2] राज्याची मार्गदर्शक तत्वे नैतिक सिद्धांतावर आधारित असून त्यांची योग्य अंमलबजावणी करणे ही संविधानात्मक नीतिमत्ता असून त्याचे उत्तरदायित्व राजकीय पक्ष तसेच त्यांचे कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांचे आहे. परंतु भारतीय लोकशाहीतील राजकीय पक्षांनी त्यांच्या धोरणात नैतिकता जोपासून संविधानात्मक कायद्याचे पालन करणे याची आज गरज निर्माण झाली आहे.

**मार्गदर्शक तत्त्वासंदर्भात राजकीय पक्षांची धोरणे:**

राजकीय लोकशाहीचा पाया हा आर्थिक आणि सामाजिक न्यायावर आधारित असतो. कायदे निर्मिती करत असताना मार्गदर्शक तत्त्वांना प्राधान्यक्रम देणे हे सरकारचे मूलभूत कर्तव्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,"मार्गदर्शक तत्वे ही महत्त्वाची असली तरी त्यांना घटनात्मक संरक्षण देण्यात आलेले नाही. याचा अर्थ असा की, तत्त्वे अमलात आणण्यासाठी आपण न्यायालयात दाद मागू शकत नाही. पण ही तत्वे उद्याचे अधिकार आहेत. मार्गदर्शक तत्त्वात अंतर्भूत असलेल्या तरतुदी कोणत्याही न्यायालयाकरवी अंमलबजावणीसाठी योग्य असणार नाहीत. पण तरीसुद्धा त्यात घालून दिलेली तत्वे देशाच्या शासन व्यवहाराच्या दृष्टीने मूलभूत आहेत. आणि कायदे करतानाही तत्वे लागू करणे हे राज्याचे कर्तव्य असेल."[3] राज्याची मार्गदर्शक तत्वे हे भारतीय संविधानाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ही तत्वे म्हणजे कायदेमंडळाला व कार्यकारी मंडळाला योग्य शासन करण्यासाठी दिलेल्या महत्त्वाच्या सूचना आहेत.

भारतीय राज्यघटनेत सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,"माझ्या दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वांना अतिशय महत्त्व आहे. कारण आर्थिक लोकशाही हे आमचे उद्दिष्ट आहे. ही गोष्ट त्यामध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे."[4] आपल्या राज्यघटनेत राजकीय लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी

तिसऱ्या विभागात मूलभूत हक्क दिलेले आहेत. परंतु आपल्या दृष्टिकोनातून राजकीय लोकशाही एवढीच आर्थिक लोकशाही देखील महत्त्वाची आहे. ही गोष्ट घटनाकारांनी मार्गदर्शक तत्त्वांचा राज्यघटनेत समावेश करून अधोरेखित केली.

राज्याची नितीनिर्देशक तत्वे सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायावर आधारित आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेमध्ये म्हणतात, "26 जानेवारी 1950 रोजी आपण अंतर्विरोधपूर्ण जीवनात पदार्पण करीत आहोत. राजकारणात समता आणि सामाजिक व आर्थिक जीवनात विषमता अशी आपली स्थिती असेल. राजकारणात आपण एक व्यक्ती एक मत, एक मूल्य हे तत्व स्वीकारलेले आहे. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात देखील सामाजिक व आर्थिक संरचनेमुळे एक व्यक्ती एक मूल्य हे तत्त्व आपण नाकारतच राहू, हा अंतर्विरोध आपण लवकरात लवकर दूर केला पाहिजे. एरवी येथे जे लोक विषमतेचे बळी आहेत, ते देखील राजकीय लोकशाहीचा या संविधान सभेने परिश्रमपूर्वक उभा केलेला डोलारा जमीनदोस्त केल्याखेरीज राहणार नाहीत."[5] त्यामुळे कोणत्याही राजकीय पक्षांनी याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यांनी मार्गदर्शक तत्त्वांची आणि त्यांच्या धोरणांची अंमलबजावणी काटेकोरपणे केलीच पाहिजे. पण आजच्या राजकीय पक्ष व्यवस्थेमध्ये असं होताना दिसत नाही.

राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख राजकीय पक्ष आपल्या ध्येय धोरणामध्ये करतात. त्याचप्रमाणे निवडणुकीत देखील त्यांची ध्येयधोरणे ही नैतिक मूल्यावरच आधारित असतात."मार्गदर्शक तत्वे सरकारला मार्गदर्शक करणारी आहेत.समाजात राजकीय लोकशाही बरोबरच सामाजिक लोकशाही स्थापन व्हावी. सत्तेवर येणाऱ्या सरकारने मार्गदर्शक तत्वात रेखाटलेल्या आर्थिक रचनेची अंमलबजावणी करावी. धर्मनिरपेक्ष व समाजवादी समाज स्थापन करावा. अशी या मागची भूमिका होती. मात्र हे ध्येय साध्य करण्याचे मार्ग वेगवेगळे असतील असे डॉ. आंबेडकर म्हणाले होते."[6] मार्गदर्शक तत्वे सरकारच्या कारभारात मार्गदर्शन करण्याचे महत्त्वाचे काम करतात. जरी न्यायालयीन संरक्षण त्यांना देण्यात आलेले नसले तरी देशाचा कारभार करताना त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. म्हणूनच कायदे करत असताना सरकारने आणि राजकीय पक्षांनी ही जी नितीनिर्देशक तत्वे दिलेली आहेत ती लक्षात घेऊन आपली धोरण ठरवलं हे महत्त्वाचं आहे. तसेच त्यांची अंमलबजावणी ही काटेकोरपणे करणं ही तितकीच त्यांची जबाबदारी आहे. राज्याची मार्गदर्शक तत्वे हे भारतीय संविधानाचे नाविन्यपूर्ण वैशिष्ट्य आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीत मार्गदर्शक तत्त्वांना पाठिंबा देताना म्हणतात, "सत्तेवर येणाऱ्या पक्षाला निवडणुकीच्या वेळी मतदारसंघासमोर यासंबंधी उत्तर द्यावे लागेल."[7] सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी मतदारांनी विचारलेल्या या तत्त्वांची अंमलबजावणी किती झाली या प्रश्नाचे उत्तर सर्वच राजकीय पक्षांना द्यावे लागेल.

**राजकीय पक्ष व्यवस्था सदृढ हवी:**

सध्या अलीकडच्या राजकीय पक्ष विषयक कायद्यांची संरचना ही घटनात्मक तरतुदी, लोकप्रतिनिधी कायदा 1951, निवडणूक आयोगानचे नियम आणि निर्देश, सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे यावर आधारलेली आहे आणि पक्षाची निर्मिती किंवा स्थापना,पक्षांतर्गत वादाचे निराकरण, पक्षाला मिळणारा निधी व त्याचे लेखापरीक्षण, नियमांच्या उल्लंघनाचे परिणाम अशी त्याची व्याप्ती आहे. त्यासाठी काही मुद्द्यांचा विचार करावा लागेल.

१) पक्षांची पारदर्शक सुस्पष्ट सहरचना ही संविधानिक मूल्यानुसार आणि लोकशाहीवादी असेल याची शाश्वती पाहिजे.

२) निवडणुकीनंतरही अशा पक्षांच्या अंतर्गत लोकशाही नियमनाची जबाबदारी व अधिकार निवडणूक आयोगाला प्रधान करणे.

३) विविध स्तरावरील उमेदवारावरून व इतर कारणामुळे होणाऱ्या पक्षांतर्गत विवादांचे निराकरण करण्याकरिता सदृढ पक्षांतर्गत व्यवस्था अनिवार्य करणे.[8]

सध्याच्या प्रश्नांची मूळ राजकीय पक्षांचे नियमन करणारे हे कायदे पुरेशी सक्षम नसणे यातच आहे. जर अशा प्रकारे नियमन, अस्तित्व, कार्यप्रणाली यासंबंधी सर्व समावेशक कायदा असता तर कदाचित पक्ष फुटीचे इतके जटील प्रश्न निर्माण झाले नसते. पक्षांतर किंवा पक्षातील बदल या टोकापर्यंत आता संघर्ष होताना दिसतो. लोकशाहीचा विकास साधताना, धोरणे राबवताना राजकीय पक्षांची भूमिका ही महत्त्वाची आहे. परंतु संविधानिक पदावरील राजकीय व्यक्ती आणि त्यांचे असणारे राजकीय पक्षाशी असणारे संबंध हे बऱ्याच वेळी व्यक्ति- सापेक्ष होऊन त्याचे रूपांतर केंद्रीकरणात होताना दिसते.1885 सालच्या 52 व्या घटनादुरुस्तीने पक्षांतर बंदी राज्यघटनेच्या परिशिष्ट 10 मध्ये तरतुदीमुळे गोंधळात अधिक भर पडलेली आहे. राजकीय पक्षांचे नियमन हे संविधानाच्या कक्षेत अंतर्भूत नाही म्हणून पक्षविषयक तरतुदी संविधाना बाहेर ठेवल्या गेल्या हे खरे आहे. पण केवळ राज्यघटनेत उल्लेख नाही म्हणून पक्षांना कोणत्याच नियमनाची गरज नाही हा युक्तिवाद अराज्यतेकडे जाताना दिसतो.राज्यघटनेतील अनुच्छेद 334 ते 328 प्रमाणे पारित केलेल्या विविध प्रशासकीय अध्यादेश तसेच लोकप्रतिनित्व कायद्याच्या कलम 29 द्वारे निवडणूक काळात राजकीय पक्षाची कर्तव्य, धोरणे, अधिकार व त्यांचे वर्तन योग्य नियमन होताना दिसते. परंतु या खेरीच राजकीय पक्ष निरंकुशच राहतात. प्रत्येक निवडणुकीनंतरची राजकीय मुत्सेद्दीगिरी लोकशाहीच्या विकासाला आणि पक्षांची धोरणे राबवताना घातक ठरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाचे मर्म जाणून हे करणे सर्वच राजकीय पक्षांच्या हितासाठी आवश्यक आहे. एकंदरीत लोकशाही व्यवस्था सदृढ व्हावी यासाठी राजकीय पक्षांनी आपल्या ध्येयधोरणांची कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अन्यथा सत्ता बदलाला जनतेच्या न्यायालयाची म्हणजेच निवडणुकीनंतरचीच वाट बघावी लागेल.

**समारोप:**

राजकीय पक्षांनी आपल्या धोरणांद्वारे केवळ राजकीय सत्ता हस्तगत करणे एवढाच उद्देश नाही तर आर्थिक व्यवस्था निर्माण करणे हा आहे. मार्गदर्शक तत्वे ही न्यायप्रविष्ट स्वरूपाची नसल्याने त्यामागे कायद्याचे पाठबळ नाही. मार्गदर्शक तत्वाकडे दुर्लक्ष करणाऱ्या राजकीय पक्षांना तसेच राज्यकर्त्यांना मतदार निवडणुकीमध्ये धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत. आपली प्राथिनिधिक लोकशाही पद्धती आहे. आपण मत देऊन आपल्या प्रतिनिधीला आपल्या वतीने काम करायला सांगतो. लोकप्रतिनिधी निवडणे म्हणजे लोकांच्या वतीने त्यांनी काम करावे याला मंजुरी देणे. राजकीय पक्षांच्या कामाचे मूल्यमापन, चिकित्सा, कामगिरी समाधान कारक नसल्याने टीका करणे, त्या टीकेला प्रसिद्धी देणे, जनमत प्रभावित करणे आणि पुढील निवडणुकीत त्यांना पराभूत करणे याचा अधिकार भारतीय घटनेने लोकांना दिलेला आहे. त्यामुळे सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी मतदारांनी विचारलेल्या या तत्त्वांची अंमलबजावणी किती झाली या प्रश्नाचे उत्तर सर्वच राजकीय पक्षांना द्यावे लागेल.

**संदर्भ:**


1. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता, खंड 20, संपा.हरी नरके,उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई,1005, पृ.116.
2. माने भगवान, भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वे, समाज प्रबोधन पत्रिका, संपा.चौसाळकर अशोक, कोल्हापूर, ऑक्टोबर -डिसेंबर -2016,पृ.164.
3. भारताचे संविधान, चौधरी लॉ पब्लिशर्स, पुणे 2014, पृ.34.
4. पाटील व्ही.बी., भारताची राज्यघटना, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, 2001, पृ.91.

4) भोळे भा.ल., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, 2010,पृ.35-26.

5) चौसाळकर अशोक, आपल्या राज्यघटनेची ओळख, प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, मार्च 2017,पृ.38

6) ऑस्टिन ग्रॅनव्हील, भारतीय राज्यघटना, राष्ट्राची कोनशीला,डायमंड प्रकाशन, पुणे,पृ.87.

7) थिकडे नाईक, गिरीश, संपादकीय, राजकीय पक्ष व्यवस्था सदृढ हवी, दै. लोकसत्ता, पुणे, दि.16 जानेवारी 2024,पृ.7.